# <u>प्रेसनोट</u>

दि. ३०/०६/२०२२

## महिला सहायक पोलीस निरीक्षकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | निगडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | महिला डॉक्टर, वय - ६२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक — नलिनी शंकर शिंदे,<br>पद - सहायक पोलीस निरीक्षक, (API)<br>नेमणूक - महिला अत्याचार निवारण कक्ष,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,००० रू. (पाच लाख रूपये) |
| लाच स्वीकारली रक्कम | २,००,०००/- (दोन लाख रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ३०/०६/२०२२ ठिकाण — निगडी येथील खाजगी हॉस्पीटलमध्ये

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या हॉस्पीटलचे सोनोग्राफी सेंटर सील न करण्यासाठी व गुन्हयाच्या तपासामध्ये सहकार्य करण्यासाठी महिला अत्याचार निवारण कक्ष, सिंधुदुर्ग येथील येथील सहायक पोलीस निरीक्षक नलिनी शिंदे यांनी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता यातील आरोपी लोकसेवक या मालवण पोलीस स्टेशन जिल्हा सिंधुदुर्ग येथे बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल असलेल्या गुन्हयाच्या तपासी अधिकारी असून सदर गुन्हयाचे तपासकामी पुणे येथे आल्यावर तक्रारदारांच्या हॉस्पीटलचे सोनोग्राफी सेंटर सील न करण्यासाठी व तपासामध्ये सहकार्य करण्यासाठी आरोपी लोकसेवक स.पो.नि. नलिनी शिंदे यानी तक्रारदार यांचेकडे ५,००,०००/- (पाच लाख) रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती २,००,०००/- रूपयांची लाच स्वीकारल्यावर रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१३.<u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
१४.ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
१५.व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३
१६.व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई — ९९३०९९७७००
१०.ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
१७.वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
१८.ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.